# Municipal Corporation of Greater Mumbai
# बृहन्मुंबई महानगरपालिका

### नि:समर्थ(दिव्यांग) उमेदवारांसाठी विशेष भरती मोहीम
### Walk-In-Selection

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खाते/विभाग/रुग्णालयांच्या आस्थापनेवरील नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांसाठी राज्य शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या धोरणानुसार खालील तक्त्यात नमूद केलेली 'ड' संवर्गातील अपंगांची अनुशेषाची पदे Walk-In-Selection पध्दतीने भरण्यासाठी निवड यादी तयार करावयाची असल्याने खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अटीची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात परिपूर्ण भरलेला अर्ज तसेच प्रमाणपत्राच्या मूळ प्रती व प्रमाणित प्रतीसह निवडीच्या वेळापत्रकात नमूद केलेल्या ठिकाणी व दिनांकास भरतीकरिता हजर राहावे.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **अपंग प्रवर्ग** | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| | | **अंधत्व/ क्षीणदृष्टी** | **चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू** | **श्रवणशक्तीतील दोष** | |
| 1 | आया (केवळ स्त्री उमेदवार) | 11 | 11 | 8 | **30** |
| 2 | कामगार/कक्षपरिचर/हमाल इ. | 228 | 168 | 144 | **540** |
| | **एकूण** | **239** | **179** | **152** | **570** |

उपनिर्दिष्ट संकेतांक क्र.1 व 2 वरील पदासाठीची शैक्षणिक अर्हता व अन्य अटी खालीलप्रमाणे आहेत.

- वेतनश्रेणी : 5200-20200 + ग्रेड पे रु.1800/-
- अर्हता :
  1) इयत्ता 10 वी (एस.एस.सी.) किंवा तत्सम परिक्षा 100 गुणांच्या मराठी विषयासह किमान 40% गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. शालांत परीक्षेत "Best of Five Marks" गुणपत्रिका असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांनी शालांत परीक्षेत घेतलेल्या सर्व विषयांच्या एकूण गुणांची किमान 40% टक्केवारी विचारात घेण्यात येईल.
  2) मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे आवश्यक आहे.
- वय : उमेदवारांचे वय **दि. 01 ऑक्टोबर 2016** रोजी किमान 18 वर्षे व कमाल 45 वर्षे असावे.

- निवडीचे निकष :
  नि:समर्थ(दिव्यांग) उमेदवाराने इयत्ता दहावीत प्राप्त केलेल्या अधिकतम गुणांच्या टक्केवारीच्या आधारे निवड यादी तयार करण्यात येईल. एका पेक्षा अधिक नि:समर्थ(दिव्यांग) उमेदवारांना इयत्ता दहावी मध्ये गुणांची टक्केवारी समान असल्यास नि:समर्थ(दिव्यांग) उमेदवाराच्या जन्म दिनांकानुसार वयाच्या जेष्ठतेनुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल.

- उमेदवार अंधत्व-क्षीणदृष्टी/चलनवलन विषयक विकलांगता/श्रवणशक्तीतील दोष असल्यास त्यांनी त्याबाबत किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची छायाप्रत अर्जासोबत जोडावी.

सदर पदांची विहित अर्हता धारण करणा-या नि:समर्थ(दिव्यांग) उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्जासोबत प्रमाणपत्राच्या मूळ प्रती, छायांकित साक्षांकित प्रती व पारपत्र आकाराचे अलीकडच्या काळातील दोन फोटोंसह सदर ठिकाणी ठरवून दिलेल्या वेळेत उपस्थित राहावे.

उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे इयत्ता दहावीत प्राप्त केलेल्या टक्केवारीप्रमाणे उपस्थित राहावे.

भरतीचे ठिकाण: नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र
अभिनव नगर, नॅशनल पार्क जवळ
बोरीवली (पूर्व), मुंबई-400 066.

पद - कामगार / हमाल / कक्षपरिचर / आया इ.

| अ.क्र. | दिनांक | नि:समर्थ(दिव्यांग) प्रवर्ग | दहावीची टक्केवारी | वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | 8 नोव्हेंबर 2016 | अंधत्व/क्षीणदृष्टी | 60% किंवा अधिक टक्केवारी प्राप्त केलेले उमेदवार<br>40% ते 60% पेक्षा कमी टक्केवारी प्राप्त केलेले उमेदवार | स. 9.30 ते दु.12.30<br>दु.1.30 ते दु. 4.30 |
| 2 | 9 नोव्हेंबर 2016 | चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू | 60% किंवा अधिक टक्केवारी प्राप्त केलेले उमेदवार<br>40% ते 60% पेक्षा कमी टक्केवारी प्राप्त केलेले उमेदवार | स. 9.30 ते दु.12.30<br>दु.1.30 ते दु. 4.30 |
| 3 | 10 नोव्हेंबर 2016 | श्रवणशक्तीतील दोष | 60% किंवा अधिक टक्केवारी प्राप्त केलेले उमेदवार<br>40% ते 60% पेक्षा कमी टक्केवारी प्राप्त केलेले उमेदवार | स. 9.30 ते दु.12.30<br>दु.1.30 ते दु. 4.30 |

सर्वसाधारण अटी

1. अपंग पुनर्वसन कायदा 1995 च्या अनुषंगाने अपंगांकरीता राखीव ठेवण्यात आलेली 3% पदे भरण्यात येत आहेत.
2. रिक्त पदांची उपलब्धता आणि आवश्यक गरजेनुसार नेमणूका केल्या जातील.
3. निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
4. उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन कोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.
5. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
6. उमेदवाराने खालील नमूद केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर कागद पत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

   **अ.** उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र, संबंधित गुणपत्रिका, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र, जाती वैधतेचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र, किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र यांच्या मूळप्रती व सांक्षांकित छायांकित प्रती.

   **ब.** विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

   उमेदवाराचे वय दि. 1 ऑक्टोबर 2016 रोजी किमान 18 वर्षे व कमाल 45 वर्षे असावे.
7. अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पूर्ण असावेत.
8. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील स्वत:चे छायाचित्र स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. याच छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील प्रक्रीयेसाठी स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.
9. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणा-या) आकारातील असावे.
10. बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या सोयीनुसार वेगवेगळ्या पदांसाठी वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या ठिकाणी निवड करण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.
11. उमेदवारांच्या अर्जाची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्यामुळे उमेदवाराने त्याचे नाव, जन्मतारीख, पत्ता व सांखिकी माहिती मराठी भाषेमध्ये सुस्पष्ट, सुवाच्य व ठळक अक्षरात लिहिणे अत्यंत आवश्यक आहे.
12. नि:समर्थ(दिव्यांग) उमेदवाराने किमान 40 टक्के अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र व त्याची प्रत सोबत आणावी. शासकीय सक्षम प्राधिकऱ्याकडून किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या नि:समर्थ(दिव्यांग) उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने सदर नि:समर्थ(दिव्यांग) उमेदवार हा कामगार/कक्षपरिचर/हमाल/आया इ. पदाचे कर्तव्य बजावण्यास अपंगत्वाच्या दृष्टीकोनातून शारिरीकदृष्ट्या पात्र

ठरल्यानंतरच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

13.उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आणणे आवश्यक आहे.

14. फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड इ. सोबत आणणे आवश्यक आहे.

15. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्र सादर केल्याने किंवा माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

16. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो/ती भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

17. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

18.निवड झालेल्या उमेदवारांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारास 'ड' संवर्गातील पदावरील नियुक्तीनंतर, महापालिकेच्या आवश्यकतेनुसार, तिन्ही पाळींमध्ये (Shift Duty) कामकाज करावे लागेल.

19.जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

20. अर्जदारास पदाच्या अर्हतेनुसार मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

21.निवड झालेल्या उमेदवारांमधून ज्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल त्यांना मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, 1999 लागू होतील.

22.निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम 1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

23.उमेदवारांना निवडप्रक्रीयेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

24.उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

25.शासन अधिसूचना दि.28.03.2005 व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक दि.01.07.2005 लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

26.प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार माननीय महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

27.विशेष भरती मोहिमेअंतर्गत सदर नियुक्त्या ह्या तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असतील.

28.निवडयादी एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यत विधिग्राह्य असेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

29. 'नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या तक्त्यामधील कामगार / कक्षपरिचर / हमाल /आया इ. पदाची कर्तव्ये, जबाबदारी व त्यासाठी आवश्यक ती शारिरीक क्षमता / पात्रता यांची नोंद घ्यावी.'

| पदनाम | कर्तव्य /जबाबदारी | अपेक्षित शारिरीक क्षमता/पात्रता |
|---|---|---|
| कामगार/ कक्षपरिचर/ हमाल / आया इ. | अंगमेहनतीची कामे करणे, रुग्णांची काळजी/सेवा करणे इत्यादी.<br>वरिष्ठांनी नेमून दिलेली कामे करणे. | ST (बसणे), BN (वाकणे), PP (ओढणे, ढकलणे), L (उचलणे), KC (गुडघे टेकणे,आकुंचन स्थितीत बसणे ), W (चालणे), |

30.निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

31. उमेदवाराने या भरतीप्रक्रिया संदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया बृहन्मुंबई महानगरपलिकेचे संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे.

32.निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

33.**विशेष सूचनाः**

- सेवायोजन कार्यालय यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या मूळ / साक्षांकित प्रतीसह / वैयक्तिक माहितीसह हजर राहणे आवश्यक आहे.
- जाहिरातीत नमूद केलेल्या पदसंख्येत बदल होऊ शकतो.

- जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
- मध्यस्थ / ठक / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविण्याऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| सही/-<br>प्रमुख कामगार अधिकारी (प्र.) | सही/-<br>प्रमुख कर्मचारी अधिकारी | सही/-<br>उप आयुक्त (म.भ.प्रा.) |
| सही/-<br>उप आयुक्त (सा.प्र.) | सही/-<br>अति.आयुक्त (प.उप.) | म.न.पा.आयुक्त |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## अर्जाचा नमुना

पदाचे नाव:------------------

| |
|---|
| उमेदवाराचे त्याचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी. |

प्रति,

------------------

------------------

------------------

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध विभाग/खाते/रुग्णालयामध्ये-------------------------- पदाकरिता मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

1. (अ) संपूर्ण नाव - मराठी (आडनाव प्रथम)

(प्रत्येक रकान्यात एकच अक्षर लिहावे. तसेच दोन शब्दांमध्ये एक रकाना रिक्त ठेवावा)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(ब) संपूर्ण नाव - इंग्रजी (आडनाव प्रथम)

(प्रत्येक रकान्यात एकच अक्षर लिहावे. तसेच दोन शब्दांमध्ये एक रकाना रिक्त ठेवावा)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(क) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नांव: श्री.------------------------------------

2. पत्ता (पत्रव्यवहाराचा) - मराठी

(प्रत्येक रकान्यात एकच अक्षर लिहावे. तसेच दोन शब्दांमध्ये एक रकाना रिक्त ठेवावा)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

पत्ता (पत्रव्यवहाराचा) - इंग्रजी

(प्रत्येक रकान्यात एकच अक्षर लिहावे. तसेच दोन शब्दांमध्ये एक रकाना रिक्त ठेवावा)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

3. जन्मदिनांक:

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

4. वय (दिनांक 01.10.2016 रोजी पूर्ण वय)-

5. जातप्रवर्ग -(आवश्यक ठिकाणी √ अशी खुण करावी)

| अजा | अज | विजा(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

6. शैक्षणिक अर्हता:

| अ.क्र. | परीक्षा मंडळाचे नाव | एकूण गुण | प्राप्त झालेले गुण | टक्केवारी | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | मराठीमध्ये प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

7. उमेदवार दहावी किती प्रयत्नात उत्तीर्ण आहे :----------------------

8. अ) सेवायोजना कार्यालयाचे नोंदणीपत्र क्रमांक व दिनांक :----------------------

ब) नुतनीकरणाचा दिनांक :----------------------

9. उमेदवार रहात असलेल्या जवळपासच्या पोलिस स्टेशनचा पत्ता :----------------------

10. अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? :----------------------

ब) झाली असल्यास त्याचा तपशील द्यावा. :----------------------

क) उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी किंवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास त्याबाबतचा तपशील :----------------------

11. अपंगत्वाचा प्रकार -

अ) अंधत्व/क्षीणदृष्टी ☐ ब) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू ☐ क) श्रवणशक्तीतील दोष ☐

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू,

सोबत: प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रतिलिपी

अर्जदाराची सही/-

अर्जदाराचे नाव:

ठिकाण:

दिनांक: